सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - आब्बास लालु चौधरी,
वय - ४५ वर्षे, व्यवसाय -व्यापारी,
राहणार - नेवासा ता. नेवासा, जि. अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

मी आरोपीला ओळखतो कारण त्याचे व माझे नेहमी जाणे-येणे असते. घटना अंदाजे ४ ते ५ वर्षांपुर्वी दुपारचे ३.०० ते ३.३० वाजेच्या दरम्यान ऊस्थळ येथे घडली होती. घटनेच्या दिवशी मी सुरेगाववरून नेवासा गावाकडे येत होतो. त्यावेळी नळगेवस्तीजवळ काय चालले आहे हे पाहण्यासाठी मी थांबलो होतो. तिथे माझी व आरोपीची किरकोळ कारणावरून बाचाबाची झाली. याव्यतिरीक्त काहीही घडले नाही. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मी वाचुन पाहिला नव्हता. सहीस निशाणी २९ देण्यात येते. असे काही घडले नव्हते की, नळगेवस्तीजवळ आरोपी व इतर दोन इसमांनी मला मारहाण केली व आरोपीने माझा मोबाईल बळजबरीने हिसकावुन नेला.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/०३/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजण्याच्या दरम्यान मी सुरेगाव येथील नातेवाईकांना भेटण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास मी परत येत असताना नळगेवस्तीजवळ एका ट्रकमध्ये जनावरे भरलेली दिसुन आली व त्याच्या बाजुला लोकांचा जमाव होता. हे म्हणणे खरे आहे की, मी माझी मोटारसायकल तिथे थांबवली असता आरोपी व दोन इसम तिथे आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व इतर दोन इसम मला म्हणाले की, ''हा सुध्दा जनावरे वाहतुक करणारा आहे'' असे म्हणुन त्यातील एकाने लाकडी काठीने डाव्या जबड्यावर मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या तोंडातुन रक्तस्त्राव सुरू झाला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी दुस-या इसमाने माझ्या पाठीवर काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या वरच्या खिशातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल बळजबरीने काढुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी आरोपीस झटका देवुन गाडी घेऊन तिथुन निघुन गेलो. हे

म्हणणे खरे नाही की, इतर दोन इसमांना मी पाहिल्यास ओळखु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला फिर्याद वाचुन दाखवली व त्यानंतर मी सही केली. आता मला माझ्या फिर्यादीतील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात आला. तो पोलीसांनी तसा का नोंदवला आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा व आरोपीचा वाद न्यायालयाबाहेर मिटलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिटल्यामुळे मला हि केस चालवायची नाही. म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ एन.एस. जोशी यांचेमार्फत नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक-२६/०९/२०२५.